महाराष्ट्र शासन


# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/ 1754

दिनांक :- 07 JUL 2026

प्रति

प्राचार्य,
थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त/उपलब्ध जागांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ :- १.संचालनालयाची अॅडमिशन नोटिस क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२६/थेट व्दितीय वर्ष पदविका/३०१ दिनांक २२.०६.२०२६

२. मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/DSD Vacancy/२०२६/३३२ दिनांक ०७ जुले २०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीचे संपूर्ण वेळापत्रक संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये घोषित केले आहे. सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त/उपलब्ध जागांची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रमनिहाय मागील वर्षात प्रथम वर्षासाठी मंजुर करण्यात आलेले प्रवेश, प्रथम वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे निकाल, संस्था सोडुन गेलेले विद्यार्थी, अभ्यासक्रम बदल,संस्था स्थलांतर इ.बाबीची माहिती थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. तदनंतर प्रणालीव्दारे नियमानुसार ऑनलाईन पध्दतीने रिक्त माहिती परिगणना करण्यात येईल. प्रणालीव्दारे परिगणना करण्यात आलेल्या रिक्त जागांची संख्या प्राचार्यांनी पडताळुन निश्चित करण्यात यावी.

तसेच ज्या संस्थांना थेट व्दितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स कार्यरत व्यावसायिक उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीसाठी मान्यता मिळालेली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित शिखर परिषदेची मान्यता,शासन मान्यता,त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता समकक्षता प्रदान केल्याची माहिती Intake Approval System या प्रणालीवर अद्ययावत करण्यात यावी.

संस्थांनी या दोन्हीबाबतची माहिती अद्ययावत करुन पोर्टलवर सादर करुन या कार्यालयात **दि.०९ जुलै २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहून RO Login मधून अद्ययावत करुन घ्यावी.** सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७३५६/४९२/४१०/४३०
ईमेल- -- desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक : कालमर्यादा दि.०९/०७/२०२६

क्रमांक : १०/एडीएम/DSD Vacancy/२०२६/३३२ दिनांक : ०७ जुलै २०२६

प्रति,
प्राचार्य,
थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त / उपलब्ध जागांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत

संदर्भ:- संचालनालयाची ॲडमिशन नोटिस क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२६/ थेट द्वितीय वर्ष पदविका/३०१, दिनांक: २२/०६/२०२६

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीचे संपुर्ण वेळापत्रक संदर्भीय परिपत्रकाद्वारे घोषित केले आहे. सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त / उपलब्ध जागांची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रमनिहाय मागील वर्षात प्रथम वर्षासाठी मंजुर करण्यात आलेले प्रवेश, प्रथम वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे निकाल, संस्था सोडुन गेलेले विद्यार्थी, अभ्यासक्रम बदल, संस्था स्थलांतर इ. बाबीची माहिती थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. तदनंतर प्रणालीद्वारे नियमानुसार ऑनलाईन पद्धतीने रिक्त माहिती परिगणना करण्यात येईल. प्रणालीद्वारे परिगणना करण्यात आलेल्या रिक्त जागांची संख्या प्राचार्यांनी पडताळुन निश्चित करण्यात यावी.

तसेच ज्या संस्थांना थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीसाठी मान्यता मिळालेली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता समकक्षता प्रदान केल्याची माहिती Intake Approval System या प्रणालीवर अद्ययावत करण्यात यावी.

या दोन्हीबाबतची कार्यवाही संस्थांनी दि.०९ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत करावी. सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती/छ.संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे. यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधित पदविका संबधित पदविका संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती